## न्यायनिर्णय

(दिनांक २७/०४/२०२६ रोजी न्यायालयात घोषीत)

अभियोगपक्षाची कथने आणि अभिलेखावरील कागदपत्रे यानुसार पुढील वादप्रश्न माझ्यासमोर उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दिनांक ०४/०९/२०२० रोजी रात्री १६.४० वाजताचे सुमारास मौजे आर्णी येथील सार्वजनिक जागी आरोपी हे वरळी मटक्याचा जुगराचा खेळ खेळतांना सट्टाचे साहित्य व रोख रुपये ३७८०/– सह मिळून आले? | नाही |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### – कारणमिमांसा –

**वादप्रश्न क्र.१ करिताः–**

२. आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आला. अभियोग पक्षातर्फे उमेश राधेश्याम गुप्ता (अ.सा.क्र.०१) याला पंच साक्षीदार म्हणून तपासण्यात आले. त्याने कथन केले की, "पोलीसांनी मला पंच म्हणुन पंचनाम्याकरीता बोलाविले होते. मी यवतमाळ वरून पोलीसांसोबत आर्णीमध्ये आलो होतो. पोलीसांनी मला सांगीतले होते की, रेड टाकण्याकरीता जायचे आहे. पोलीसांनी मटक्याच्या अडडयावर धाड टाकली होती.पोलीसांनी मटका साहीत्य व

काही नगदी पैसे आरोपींकडुन माझेसमक्ष जप्त केले होते. आरोपी त्यावेळेस तिथे हजर होते. पोलीसांनी निशाणी २६ कडील पंचनामा तयार केला होता.”

पुरेशी संधी देवून देखील सदरचा साक्षीदार उलटतपासाकरिता हजर राहिला नाही. न्यायालयामार्फत स्वतःहुन इतर साक्षीदारांना समन्स पाठविण्यात आले. परंतू इतर साक्षीदार गैरहजर राहील्याने तसेच जलदगतीने न्याय मिळणे हा आरोपीचा संविधानीक अधिकार असल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

३. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी, दूसरा पंच व तपास अधिकारी यांना तपासले नाही. आरोपींविरुध्द कोणताही भक्कम पुरावा अभियोगपक्ष अभिलेखावर आणू शकले नाही. आरोपींनी गुन्हा केल्याचे संशयापलिकडे जावुन सिध्द होत नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र.२ करिताः–**

४. अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाउन सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणुन वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र.१ फिरोज सलीम चव्हाण व क्र.२ बुद्धकिरण पुरूषोत्तम कांबळे शेख यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येत असून त्यांना वर नमुद गुन्हयातून मुक्त करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३ | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे आरोपींनी दयावयाचा रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन कदबा या आदेशापासून पुढील सहा महिन्यांकरीता अस्तित्वात राहिल. |
| ४ | अपील कालावधी संपल्यानंतर खटल्यातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये ३७८०/– ही रक्कम सरकार जमा करण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.04.27 17:19:58 +0530

ठिकाण:– आर्णी (विशाल श्रावण धोंडगे)
दिनांक:–२७/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

| | | |
|---|---|---|
| निकाल सांगितल्याचा दिनांक | : | २७/०४/२०२६ |
| निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक | : | २७/०४/२०२६ |
| निकालावर सही केल्याचा दिनांक | : | २७/०४/२०२६ |